adhandloomsgom@gmail.com

कार्या-२(३)/ब-१/ ४७६५ /२०१४
संचालनालय वस्त्रोद्योग महाराष्ट्र शासन,
जुने सचिवालय इमारत जी.पी.ओ.समोर,
सिव्हील लाईन नागपूर, दिनांकः- 2 SEP 2014

-: परिपत्रक :-

विषय : - केंद्र शासन पुरस्कृत सर्वसमावेशक हातमाग विकास योजनेची (Comprehensive Handloom Development Scheme) राज्यात १२ व्या पंचवार्षिक योजनेच्या कालावधीत अंमलबजावणी करण्याबाबत

मा. विकास आयुक्त (हातमाग) नवी दिल्ली यांचे पत्र क्र. ७/१/२०१२-डी.सी.एच/सी.एच.डी.एस/क्लस्टर, दि. ३०/१२/२०१३ अन्वये Comprehensive Handloom Development Scheme ही योजना १२ व्या पंचवार्षिक योजनेच्या कालावधीत महाराष्ट्र शासन सहकार वस्त्रोद्योग व पणन विभाग शासन निर्णय क्रमांक हातमाग-२०१३/प्र.क्र.१५/टेक्स-३, दि. २६/०८/२०१४ अन्वये राज्य शासनाने या योजनेचा अंमलबजावणी करीता सन २०१४-१५ या वर्षापासून मान्यता प्रदान केली आहे.

योजनेची अंमलबजावणी करण्याचा दृष्टीने खालीलप्रमाणे दिशानिर्देश निर्गमित करण्यांत येत आहे.

सदर विस्तृत हातमाग विकास योजनेत केंद्र शासनाकडून आता पर्यंत राबविण्यात आलेल्या ब-याच योजनाचा समावेश करण्यात आलेला आहे. उदा. आधीच्या आय. एच. डी. एस, एम. ई. पी. एस व डी. एच. डी. एस. या योजना आता राष्ट्रीय हातमाग विकास कार्यक्रमात बारावी पंचवार्षिक योजनेसाठी या नवीन व्यापक हातमाग विकास योजनेत समाविष्ट करण्यात आलेली आहे. सदर योजने अंतर्गत सहकार क्षेत्रातील तसेच सहकार

क्षेत्राबाहेरील विणकरांना कच्चा माल पुरवठा, कायम स्वरुपी मूलभूत सुविधेची उपलब्धता तसेच आवश्यक विपणन व्यवस्था याची शास्वती व प्रोत्साहन देण्यात आले आहे.

सी. एच. डी. एस. योजने अंतर्गत घटकाचा तपशील

| अ क्र | सी. एच. डी. एस. योजनेतील घटक | सदर योजने अंतर्गत अर्थसहाय्यासाठी पात्र उपघटक |
|---|---|---|
| १ | समुह दृढीकरण<br>प्रत्येकी ५००० हातमाग असलेले समुह व प्रत्येकी ३००-५०० हातमाग असलेले क्लस्टर | १. आराखडा विकास<br>२. उत्पादन विकास / विविधता<br>३. तंत्रज्ञान वर्धन<br>४. विपणन<br>५. समुह विकास कार्यकारीची नियुक्ती<br>६. वस्त्र आरेखक-नि- विपणन कार्यकारीची नियुक्ती<br>७. गरजेनुसार इतर व्यवधान |
| २ | नवीन समुह<br>प्रत्येकी २०० ते ३०० हातमाग असलेले समुह, २००० ते ५००० च्या दरम्यान हातमाग असलेले समुह | १. प्राथमिक सर्वेक्षण निदानात्मक अभ्यास तथा स्वंयसहाय्यता गट / सह-दायीत्व गट जनजागृती कार्यक्रम, मंडळे यांची उभारणी<br>२. ऑन-लूम उपक्रमाचे तंत्रज्ञान वर्धन<br>३. उत्पादन विकास / विविधीकरण<br>४. वस्त्र आरेखक-नि-विपणन कार्यकारीची नियुक्ती<br>५. संगणक सहायीत वस्त्र आराखडा प्रणाली (सी.ए. टी. डी.) आणि कार्ड पंचिंग मशीन (Card Punching Machine) यांची खरेदी |

| | | |
|---|---|---|
| | | ६. यार्न डेपोच्या स्थापनेसाठी कॉरपस (Corpus) निधी<br>७. विपणन विकास - हातमाग विपणन सहाय्य या घटकाअंतर्गत पुरविणे.<br>८. कौशल्य ....... (आय.एस.डी.एस) योजनेशी जोडून करणे.<br>९. सामान्य सुविधा केंद्र / रंगणी गृह स्थापन करणे.<br>१०. कर्ज सहाय्य --- आर.आर.आर. योजने अंतर्गत उपलब्ध करुन देणे.<br>११. क्लस्टर कामकाजा संबंधी दस्ताऐवजीकरण<br>१२. कर्मशाळा बांधकाम<br>१३. प्रकल्प व्यवस्थापन खर्च |
| ३ | <u>गट दृष्टीकोन</u><br><u>(Group Approach)</u> | १. कौशल्य विकास ..... (आय.एस.डी.एस.) योजने च्या अधीन<br>२. तंत्रज्ञान प्रगती<br>३. कार्यशाळा बांधकाम<br>४. कर्ज सहाय्य ...... आर.आर.आर. योजने अंतर्गत उपलब्ध करुन देणे. |
| ४ | <u>विपणन प्रोत्साहन</u><br><u>(Marketing Incentive)</u> | हातमाग संस्थांना हातमाग उत्पादनाच्या विक्रीसाठी विपणन सहाय्य |

| | | |
|---|---|---|
| ५ | हातमाग विपणन सहाय्य | १. स्थानिक विपणन प्रोत्साहन<br>अ. एक्स्पो प्रदर्शने व क्राफ्ट मेला आयोजित करणे.<br>ब. (ई मार्केटिंग साठी) वेब पोर्टल (Web Portal)<br>क. हॅण्डलूम मार्क, जियोलाजिकल इंडिकेशन (Geological Indication)<br>२. विपणन मूलभूत सुविधा विकास<br>१ - अर्बन हट व किरकोळ विक्री केंद्राची स्थापना<br>३. विपणन सुलभता<br>अ - डिझायनरचा समावेश करणे.<br>४. हातमाग निर्यात विकास<br>अ - निर्यात प्रकल्प, अंतरराष्ट्रीय प्रदर्शनात भाग घेणे, खरेदीदार व विक्रेतेच्या बैठकीचे आयोजन |
| ६ | हातमाग संस्थांना विकास व मजबूतीकरण | १. मध्य विभागात नवीन इन्डियन इन्स्टीटयुट आफ हॅण्डलूम टॅक्नालाजी (आय.आय.एच.टी.) स्थापन करणे.<br>२. मध्य विभागात नवीन विणकर सेवा केंद्र स्थापन करणे.<br>३. आय.आय.एच.टी. मध्ये पदवी अभ्यासक्रम सुरु करणे. |

| | | |
|---|---|---|
| | | ४. आय.आय.एच.टी. बरगढ चालू ठेवणे.<br>५. टेक्स्टाईल डिझाईन साठी राष्ट्रीय केंद्र (NCTD)<br>६. हातमाग संस्थांचे मजबूतीकरण<br>७. संशोधन व विकास (R & D) तसेच हातमाग कलाकौशल्य पुनरुज्जीवित करणे. |
| ७ | हातमाग गणना | हातमागाची गणना |
| ८ | इतर | १. नविन्यपूर्ण कल्पना<br>२. योजनेच्या प्रसिध्दी, देखरेख, प्रशिक्षण व मूल्यमापन |
| ९ | बांधील दायित्वे | अकरावी योजने काळातील IHDS, M & EPS आणि DHDS योजनेतील दायित्वे. |

सदर योजनेचे उद्देश खालील प्रमाणे आहेत.

१. अस्तित्वातील हातमाग समुहांच्या कायमपणासाठी त्यांचे बळकटीकरण करणे, माग दर्जा वृध्दी, डिझाईन इनपूट, कर्ज, विपणन यावर लक्ष केंद्रीत करणे, तसेच गरजेनुसार इतर हस्तक्षेप

२. निवडक हातमाग समुहांमध्ये दृष्य उत्पादन गट म्हणून हातमाग विणकरांचा गट तयार करण्यावर लक्ष केंद्रीत करणे.

३. हातमाग विणकरांचे कष्ट कमी करणे तसेच अत्याधुनिक साहित्याचा पुरवठा करुन उत्पादकता व हातमाग उत्पादनाच्या दर्जात सुधारणा करणे.

४. विणकर सेवा केंद्र व इंडियन इन्सीटयुटस आफ हॅण्डलूम टॅकनालॉजी यासारख्या हातमाग संस्थांचा विकास करुन त्यांचे बळकटीकरण करणे.

५. उद्योजक, आरेखक व व्यवसायिक यांना विपणन, आरेखन आणि उत्पादन व्यवस्थापन याकरीता एकत्रित करुन बाजार अभिमुखता तयार करणे आणि विपणन पायाभूत सहाय्य देणे.

६. सहकार क्षेत्रातील व सहकार क्षेत्राबाहेरील विणकराच्या अंतर्भावासाठी समावेशक दृष्टीकोन

७. प्रत्येक समुह / गट इ. गरजेनुसार विनिर्दिष्ट आदानासाठी (Input) सकल आणि लवचिक हस्तक्षेप

८. हातमाग कापडाला राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय बाजारपेठ उपलब्ध करुन देण्यासाठी व्यासपिठ उपलब्ध करुन देणे व ब्रँड प्रमोशन करणे.

९. विणकरांना विदेशात पाठवून सांस्कृतीक आदानप्रदान करणे.

**अस्तित्वातील समुहांचे दृढीकरण – तंत्रज्ञान उन्नतीकरण**

या समुहांच्या दृष्टिकरणाकरीता प्रति समुह रु. २०/- लक्ष पर्यंत अतिरिक्त आर्थिक सहाय्य देण्यात येईल. यापैकी ७५ टक्के निधी केंद्र शासनामार्फत व २५ टक्के निधी राज्य शासन / अंमलबजावणी संस्था / लाभार्थी यांच्यामार्फत देण्यात येईल. केंद्र शासनाच्या हिश्शाचा निधी राज्य शासनामार्फत अंमलबजावणी संस्थेस वितरीत करण्यात येईल.

या समुहांच्या गरजांचे मुल्यांकन करण्यासाठी स्थापन करावयाच्या समितीची रचना खालील प्रमाणे राहील-

१. राज्य हातमाग आयुक्त / संचालक

२. संबंधीत विणकर सेवा केंद्राचा प्रभारी अधिकारी

३. संबंधित अंमलबजावणी संस्थेचे प्रतिनिधी

४. हातमाग महासंघ/सहकारी संस्था/एनजीओ यांचे प्रतिनिधी

५. आवश्यतेनुसार इतर सदस्य

राज्य शासनामार्फत राज्यस्तरीय प्रकल्प समितीच्या शिफारशीसह सविस्तर प्रकल्प अहवाल विकास आयुक्त, हातमाग यांच्या कार्यालयास सादर करण्यात येईल. त्यासाठी केंद्र शासनाच्या जोडपत्र A-1 चा वापर करण्यात येईल.

महाराष्ट्र राज्यात केंद्र शासनाने एकुण ७ क्लस्टरला मान्यता प्रदान केलेली होती. त्यापैकी ३ क्लस्टर (१. अचलपूर, २. अहमदनगर,३. पवनी-चकारा-अड्याळ) बंद झालेले असून उर्वरित ४ क्लस्टर सद्या अस्तित्वात आहेत.

महाटेक्स मुंबई व्दारा अंमलबजावणी करण्यात येत असलेले सोलापूर क्लस्टरला रू. १८.२६ लाख अदा करण्यात आलेले असून ६.५४ लाखाचा मंजूर नसलेल्या बाबीवर त्यांनी खर्च केला असल्यामुळे त्याची वसुली होवून निर्धारित बाबीवर खर्च होत नाही तोपर्यत या क्लस्टरला अर्थसहाय्य देण्याचे प्रयोजन उरत नाही.

ईडीआय, गुजरात व्दारा अंमलबजावणी करण्यात येत असलेले येवला क्लस्टरला रू. १८.८० लाख अदा करण्यात आलेले असून त्यांनी आजतागायत फक्त १३.६५ लाखाचा खर्च केलेला असून रु. ५.१५ लाख अद्यापी त्यांचेकडे शिल्लक आहे. या क्लस्टरची प्रगती विचारात घेता दृढिकरणासाठी पात्र राहील.

मराहाम, नागपूर व्दारा अंमलबजावणी करण्यात येत असलेले मोहाडी क्लस्टरला रू. १९.८५ लाख अदा करण्यात आलेले असून त्यांनी आजतागायत रू.१९.५६ लाखाचा खर्च केलेला असून रु. ०.२९ लाख अद्यापी त्यांचेकडे शिल्लक आहे. या क्लस्टरमध्ये आवश्यक तेवढे विणकर उपलब्ध होत नसल्याने केंद्र शासनाचे पत्र दिनांक ०८.०७.२०१३ अन्वये रु. १९.३३ लाख मंजूर केलेले होते. ते महामंडळाने पत्र दिनांक ०२.१२.२०१३ अन्वये घेण्यास नकार दिलेला आहे. या क्लस्टरची अंमलबजावणी होणे आता शक्य वाटत नाही.

मराहाम, नागपूर व्दारा अंमलबजावणी करण्यात येत असलेले टेकानाका, नागपूर क्लस्टरला रू. १९.८५ लाख अदा करण्यात आलेले असून त्यांनी आजतागायत रू.१९.५६ लाखाचा खर्च केलेला असून रु. ०.२९ लाख अद्यापी त्यांचेकडे शिल्लक आहे. तसेच दुसऱ्या हप्त्यापोटी रू. २१.२० लाख माहे जानेवारी २०१४ मध्ये अदा करण्यात आलेले असून त्याचा विनियोग अद्यापही करणे शेष आहे. हा विनियोग पूर्ण झाल्यानंतर दृढीकरणासाठी पात्र राहील.

या घटकाअंतर्गत खालील प्रमाणे अर्थसहाय्य प्रस्तावित करण्यांत आले आहे.

रक्कम रु. लाख

| वर्ष | केंद्र | राज्य |
|---|---|---|
| २०१४-१५ | ३७.१८ | ३.८७ |
| २०१५-१६ | ११.५२ | २.०२ |
| २०१६-१७ | ०.०० | ०.०० |

***तरी संबंधीत प्रादेशिक उपसंचालक, वस्त्रोद्योग व अंमलबजावणी यंत्रणांनी त्यांचे आर्थिक प्रस्ताव विहित कालमर्यादेत सादर करावे.***

**नविन समुहांची निर्मिती**

या घटका अंतर्गत २०० ते ५०० विणकरांचा समुह असलेल्या क्लस्टरला रु. ६० लाखापर्यंत तर २००० ते ५००० विणकरांचा समुह असलेल्या क्लस्टरला रु. १५० लाखापर्यंत अर्थसहाय्य देण्याचे प्रस्तावित आहे. या योजने अंतर्गत प्राथमिक सव्हेक्षण, निदानात्मक अध्यायन करणे, कन्सॉरटियमची निर्मिती करणे, जनजागृती कार्यक्रम, तांत्रिक तंत्रज्ञानात उन्नतीकरण, टेक्स्टाईल डिझाईनरची सेवा घेणे, यार्न डेपोची निर्मिती करणे इ.

बाबीचा समावेश असून यात राज्य व केंद्र शासनाच्या आर्थिक सहाय्याचा आकृतीबंध खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | घटक | २०० ते ५०० हातमागाच्या समुहाकरीता अर्थसहाय्य | केंद्र/राज्य शासन वाटा |
|---|---|---|---|
| १ | बेस लाईन सर्व्हेक्षण निदानाकरीता अभ्यास व स्वयं सहाय्यता गटाची निर्मिती / सहदायीत्व गटाची निर्मिती, कन्सॉरटियमची स्थापना, जनजागृती कार्यक्रम | रु. २.०० लाखापर्यत | १०० टक्के केंद्र शासन |
| २ | ऑन लुम उपक्रमाच्या तंत्रज्ञानाचे उन्नतीकरण (समुहाला केंद्र शासनाकडून मिळणा-या एकूण अर्थसहाय्याच्या ८० टक्केपर्यत) | रु. ४८.०० लाखापर्यत | ७० टक्के केंद्र शासन २० टक्के राज्य शासन १० टक्के संबंधीत संस्था |
| ३ | उत्पादन विकास / विविधीकरण | रु. २.०० लाखापर्यत | १०० टक्के केंद्र शासन |
| ४ | डिझाईनर तथा विपणन अधिका-याची नेमणूक | रु. ३०,०००/- दरमहा किमान २ समुहाकरीता | १०० टक्के केंद्र शासन |

| | | | |
|---|---|---|---|
| ५ | कॉम्प्यूटर ऍडेड टेक्स्टाईल डिझाईन सिस्टम व कार्ड पंचिंग मशिनची आवश्यकता असल्यास खरेदी यापैकी एकाचीच आवश्यकता असल्यास एकूण रु. २.५० लक्ष रक्कम अनुज्ञेय राहील | रु. ५.०० लाख | ५० टक्के केंद्र शासन व ५० टक्के राज्य शासन / अंमलबजावणी संस्था |
| ६ | यार्न डेपोची उभारणी करण्याकरीता कॉरपस फंड | रु. ३.०० लाख | १०० टक्के केंद्र शासन |
| ७ | पणन विकास-राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय बाजारपेठ करीता प्रदर्शनाचे आयोजन, जनजागृती इ. प्रदर्शन प्रसिध्दी इ. (केंद्र शासनाच्या हिस्याच्या २० टक्के पर्यंत) | विपणन सहाय्य घटकाच्या आकृतीबंधानुसार | |
| ८ | कौशल्य उन्नतीकरण (केंद्र शासनाच्या हिश्याच्या १५ टक्के पर्यंत) | एकात्मिक कौशल्य विकास योजनेच्या आकृतीबंधाप्रमाणे. | |

| | | |
|---|---|---|
| ९ | सुविधा केंद्र/रंगणीगृह उभारणी | ८० टक्के केंद्र शासन (जागा बगळुन) २० टक्के राज्य शासन /अंमलबजावणी यंत्रणा/उद्योजक/कन्सॉरटियम |
| १० | कर्ज सहाय्य (केंद्र शासनाच्या हिश्याच्या २० टक्के पर्यंत) | संबंधीत योजनेच्या आकृतीबंधाप्रमाणे |
| ११ | समुहांच्या उपक्रमाचे अभिलेख तयार करणे | १०० टक्के केंद्र शासन |
| १२ | कार्यशाळेची निर्मिती (२० चौ.मिटर) (केंद्र शासनाच्या हिश्याच्या २० टक्के पर्यंत) | बी.पी.एल. विणकराकरीता १०० टक्के केंद्र शासन, ए.पी.एल विणकराकरीता ७५ टक्के केंद्र शासन |
| १३ | प्रकल्प व्यवस्थापन खर्च (क्लस्टर डेव्हलपमेंट आधिका-याची नियुक्ती) | १०० टक्के केंद्र शासन |

समुहाची निर्मिती ही खालीलप्रमाणे कोणत्याही यंत्रणेला करता येईल.

१. संचालक, वस्त्रोद्योग

२. राष्ट्रीय पातळीवरील हातमाग संस्था

३. राज्यस्तरीय हातमाग विकास महामंडळ

४. राज्यस्तरीय शिखर हातमाग सहकारी संस्था

५. केंद्र शासनाची संस्था

६. हातमागाशी निगडीत अशासकिय संस्था (राज्य शासनाने शिफारस केलेली व विकास आयूक्त हातमाग यांनी मान्य केलेली)